## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२५/०८/२०१८
## दि.२४/०८/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २३४/१८,भादविक ३०७ |
| **फिर्यादी** | विकास कांबळे, वय २९ वर्षे,रा.ताडीवाला रोड,पुणे |
| **आरोपी** | १)बाबा पठाण,रा.ताडीवाला रोड,पुणे २)अमर उर्फ फॅन्सी सिध्दांत शिंदे,वय २० वर्षे,रा.विकास मित्र मंडळ दत्त मंदिराजवळ,१३ ताडीवाला रोड, पुणे (अ.क्र. १ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०८/२०१८ रोजी रात्रौ ०९/३० वा.चे सुमारास राजरत्न बुध्दविहारचे मोकळया जागेत पान टपरी समोर ताडीवाला रोड, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसम बाबा पठाण याने पुर्वीचे भांडणाचा राग मनात धरुन यातील फिर्यादी हे नमुद पान टपरी समोर उभे राहिले असताना, बाबा पठाण याने माझ्याकडे काय पाहतो असे म्हणुन फिर्यादी यांनार टपरीचे दिशेने ओडत नेहुन तेथे कुंडीत ठेवलेले कोयत्यासारखे धारदार हत्यार अमर शिंदे याने बाबा पठाण यास देवुन, त्याने फिर्यादी यांचे उजव्या बाजुस कपाळावर डोक्यात,हातावर, पाठीमागे वार करुन, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पाटील ९५९४०००११८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २३५/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ४२ वर्षे,रा.कन्नड, ता.कन्नड, जि.औरंगाबाद |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०८/२०१८ रोजी पहाटे ०५/३० वा.चे सुमारास किराड चौकातील पीएमटी बस स्टॅण्ड जवळ, रिक्षामधुन प्रवास करीत असताना |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, नमुद ठिकाणावरुन रिक्षाने प्रवास करीत असताना, त्यांचे हातातील बॅग त्यामध्ये रोख रक्कम १ लाख ३० हजार रुपये, व दोन अंगठया सोन्याचा मुलामा दिलेल्या असा एकुण १ लाख ३४ हजार रु.किंमतीचा माल दोन अनोळखी इसमांनी जबरदस्तीने हिसकावुन चोरुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जमदाडे ९८२२०३०७६९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे १८८/१८,भादविक १४१,१४३,१४६,१४७,३२३,३४१,४२७,मुं.पो.कायदा कलम ३७ (१)(३) सह १३५, क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट १९३२ चे कलम ७ |
| **फिर्यादी** | अभिजीत धुमाळ,पो.ना.शिवाजीनगर पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | ६ ते ७ अनोळखी इमस |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/०८/२०१८ रोजी १४/३० वा.चे सुमारास सिटी मोबाईल शॉपी व केन्शा मोबाईल शॉपी, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर पुणे. |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी हॉटेल पांचाली शेजारी असलेल्या सिटी मोबाईल शॉपी व केन्शा मोबाईल शॉपी या दूकानाचे समोर चालू असलेल्या सॅमसंग मोबाईल कंपनीच्या प्रमोशनच्या इव्हेंटच्या साहीत्याची यातील अनोळखी ६ ते ७ कार्यकर्त्यांनी बेकायदेशीररित्या जमाव जमवून इव्हेंटच्या कार्यक्रमामुळे त्रास होत असल्याच्या कारणावरुन इव्हेटच्या साहित्याची तोडफोड करुन ईव्हेंट आयोजीत करण्या-या कर्मचा-यास हाताने मारहाण करुन,इव्हेंटचे् साहित्य रोडवर फेकुन सार्वजनिक वाहतूकीस अडथळा निर्माण करुन,मोबाईल दुकानदारांमध्ये भितीचे |

| | |
|---|---|
| | वातावरण तयार केले व त्यांनी मा.सह पोलीस आयुक्त सो.पुणे शहर यांचे जा.क्र सहपोआ/कावसु/५३५८/२०१८ दिनांक ०८/०८/२०१८ अन्वये दिनांक ११/०८/२०१८ रोजी ००/०१ पासून दि.२४/०८/२०१८ रोजी २४/०० वा.पर्यंत पुणे शहरामध्ये ५ किंवा त्यापेक्षा जास्त इसमांनी एकत्रीत जमू नये असे महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कमल ३७ (१)(३) चा प्रतिबंधक आदेश जारी असतांना सदर आदेशाचा भंग करुन बेकायदेशीर जमाव जमवून वरील कृत्य करुन ५,०००/- रुपयाचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. विजयकुमार शिंदे ७०३०२२५५५५ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४२१/१८,भादविक ४९८(अ),३०६, |
| **फिर्यादी** | सौ.रंजना सरोदे,वय ४३ वर्षे,रा.बिबवेवाडी पुणे |
| **आरोपी** | एक महिला,वय ६० वर्षे,रा.बिबवेवाडी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | मागील ११ वर्षा पासुन ते दि.२२/०३/२०१८ रोजी पर्यंत एस.आर.ए.लेक टाऊन ११ वा मजला,रुम नं.१११७ बिबवेवाडी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मयत मुलगी नामे-करिश्मा अमित चौगुले,वय २६ वर्षे, हि सासरी नांदत असताना, तीचेवर यातील नमुद महिलेने संशय घेवुन तिस वारंवार शिवीगाळ,हाताने मारहाण करुन,छळ केला त्या मुळे तिच्या त्रासाला कंटाळुन फिर्यादी यांची मयत मुलगी करिश्मा हीने घरातुन निघुन जावुन भैरोबानाला कॅनॉल या ठिकाणी वाहत्या पाण्यात उडी मारुन आत्महत्या केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. सुर्यवंशी ९४०५६६७४२३ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगावपार्क पो स्टे ८९/१८,भादविक ४५२,३५३,३४१,४२७,३४,क्रिमीनल लॉ अमेंटमेंट क.७ |
| **फिर्यादी** | विजय डगळे, वय ५२ वर्षे, रा.बिबवेवाडी, पुणे |
| **आरोपी** | शेखर बंगाळे, रा.सोलापूर व त्याचा एक साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०८/२०१८ रोजी दुपारी १३/३० वा. सुमारास आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८ क्वीन्स गार्डन, सर्कीट हाऊसजवळ, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सरकारी कर्मचारी असून,ते आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८ क्वीन्स गार्डन, सर्कीट हाऊसजवळ, पुणे येथे मुख्य लिपीक या पदावर कार्यरत आहेत. यातील फिर्यादी हे वर नमूद आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८ क्वीन्स गार्डन, सर्कीट हाऊस, पुणे या ठिकाणी काम करत असताना दुपारी १३/३० वा. सुमारास इसम नामे शेखर बंगाळे, रा.सोलापूर व त्याचा एक साथीदार या दोन इसमांनी निवेदन देण्याचे बहाण्याने प्रवेश करून, कार्यालयात येवून शासकीय कामात अडथळा आणून कार्यालयातील शिक्के, कागदपत्रे अस्तव्यस्त फेकून, घोषणा देवून,ऑफिसमध्ये त्यांचे जवळील पत्रके उधळून ऑफिसमधील खुर्चीने कपाटाचे काचा फोडून सुमारे ५००/- रू.चे नुकसान करून फिर्यादी व त्यांचे बरोबरील कर्मचारी यांना बाहेर जाण्यास प्रतिबंध केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अरूण गौड, ७६५१२२७७७ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे २७८/१८,भादविक ४२०, ४०६, ४६७, ४६८, ४७१ |
| **फिर्यादी** | सुनिल शेळके, वय ३९ वर्षे,रा. शिरूर,ता.शिरूर,जि. पुणे. |
| **आरोपी** | इरफान अब्दुलहई शेख,वय ३७ वर्षे,रा.चेतन गार्डन राजीव गांधी शाळेजवळ,कोंढवा खुर्द, पुणे (अटक ) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०५/०६/२०१८ चे पुर्वी ३ ते ४ दिवस ते आजपावेतो तहसील कार्यालय, हवेली, जि. पुणे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे निवासी नायब तहसिलदार (हवेली), म्हणुन नोकरीस असुन, वर नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी,यातील नमुद इसम इरफान शेख याने राजे जॉन यांचेकडुन अधिवास प्रमाणपत्र काढणेकामी कागदपत्रे घेवून राजे जॉन यांचे बनावट अधिवास प्रमाणपत्र तयार करून,त्याबदल्यात त्यांचेकडून ८ हजार रूपये घेतले. तसेच मा.तहसिलदार सो।, हवेली यांचा कार्यालयाचा खोटा शिक्का व सही वापरून कार्यालयाचे नावे बनावट अधिवास प्रमाणपत्र तयार करून ते राजे जॉन यांना खरे म्हणून वापरण्यास भाग पाडुन राजे जॉन व महाराष्ट्र शासनाची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. केसरकर ९९२३४७०५९९ |
| ७ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३१०/१८,भादविक ३७९,३४ तसेच महाराष्ट्र झाडे तोडणे (नियमन)अधिनियम १९६४ चे कलम ४ |
| **फिर्यादी** | सुहास चिरमे,पो.शि.स्वारगेट पो.स्टे. पुणे शहर |
| **आरोपी** | १)सुनिल नामदेव जमदाडे,वय-३४ वर्षे,रा.भिमज्योत मित्र मंडळाजवळ लक्ष्मीनगर,येरवडा पुणे. २)एक पुरुष, वय ६० वर्षे रा.सांगली. ३)कैलास प्रकाश चव्हाण,वय-३० वर्षे,रा.मच्छिंद्रगड ता.वाळवा.जि.सांगली(अ.क्र.१ व २ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०८/२०१८ रोजी रात्रौ ०३/१५ वा.ते ०३/३५ वा.चे दरम्यान न्यु प्रसन्ना सोसायटीचे मोकळे जागेत |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद इसमांनी न्यु प्रसन्ना सोसायटीचे मोकळे जागेतील चंदनाचे झाड चोरी करण्याच्या उद्देशाने तोडून बुंधे चोरी करुन घेवून जात असताना अ.क्र.१ व २ यांना जागीच पकडले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. शेख ८०८७७७७७८६ |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे ६९/१८,भादविक ३७९,५११ |
| **फिर्यादी** | हनुमंत मोरे,वय ५५ वर्षे,रा.न्यु कोपरे गाव जि.प.शाळा ता.हवेली जि.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०८/१८ रोजी ०२/४५ वा.चे सुमारास डि-२ एरिया, बंगला नं.१४५, एन.डी.ए खडकवासला पुणे येथील बंगल्याच्या लॉनमध्ये |
| **तपशिल** | वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी,डी-२ एरीया येथे पेट्रोलीग करत असताना,बंगला नं.१४५ मधील लॉनमध्ये असलेले किंमत रू.१ हजार ५००/-रू. चे चंदणाचे झाड कोणीतरी अज्ञात चोरट्याने कापुन जमिनीपासून अलग करून चोरून नेण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.ए.दुगावकर ९९२३१०७४५१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**